शुक्र तारा अस्तास गेला

--महसूल मंत्री एकनाथराव खडसे

जळगाव, दि.30 डिसेंबर- कवी मंगेश पाडगावकर यांच्या दुःख:द निधनामुळे मराठी काव्य आणि साहित्य सृष्टीतील प्रतिभासंपन्न असा शुक्र तारा कायमचा अस्तास गेला आहे, अशा शब्दात महसूल व कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी पाडगावकर यांच्या निधनाबद्दल आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. आपला शोक व्यक्त करतांना खडसे यांनी पुढे म्हटले आहे कि, मराठी काव्य सृष्टी समृद्ध करण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले.मनातील कोमल भावना तितक्याच कोमलतेने शब्द बद्ध करून गेय स्वरूपात सादर करण्याचे कौशल्य त्यांना लाभले होते.त्यामुळे त्यांची अनेक गीते लोकप्रिय झाली. मराठी भाषेच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान अविस्मरणीय राहील. मी शोकाकुल अशा पाडगावकर परिवाराच्या दु:खात सहभागी आहे., असे खडसे यांनी शोकसंदेशात शेवटी म्हटले आहे।

.............